पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी
E-Mail- sp.sindhudurg@mahapolice.gov.in
पोलीस नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्र. ०२३६२-२८२००/२२८००८
फॅक्स क्रमांक- ०२३६२-२२८२०५
पिनकोड- ४१६८१२

जावक क्र. ८/आशा/पोलीस शिपाई चालक लेखी परीक्षा-२०२४-२०२५/२०२६, सिंधुदुर्गनगरी | दिनांक: २८/०३/२०२६

# पोलीस शिपाई चालक भरती सन २०२४-२०२५
## पोलीस शिपाई चालक -लेखी परीक्षा

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२४-२०२५ मध्ये रिक्त असलेल्या ०९ पोलीस शिपाई चालक पदांकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून सदर भरतीमध्ये रिक्त पदांच्या १:१० या प्रमाणात गुणवत्तेनूसार सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे https://sindhudurgpolice.gov.in या संकेतस्थळावर दि.१५/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा **Kudal High School Junior College Kudal, Front of Saraswat Banck, Kudal-Vengurla Road, Tal-Kudal, Dist-Sindhudurg-४१६५२०** येथे **दि.०५/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित करण्यात आली आहे. तरी उमेदवारांनी लेखी परीक्षेकरीता येताना खालील सूचनांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

उमेदवारांसाठी सूचना :-

१) लेखी परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र महाआयटी कडून निर्गमीत करण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सदर प्रवेशपत्र डाऊनलोड करुन सोबत आणावे. तसेच उमेदवारांना चालक पोलीस शिपाई भरतीच्या शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी करीता महाआयटी कडून दिलेले प्रवेशपत्र व मैदानी चाचणीवेळी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाकडून दिलेले चालक पोलीस भरतीचे ओळखपत्र अशी तीन्ही प्रवेशपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तरच परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल. तसेच स्वत:चे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेले फोटोची दोन प्रत सोबत आणावी.

२) प्रवेशपत्र आणि पासपोर्ट साईज फोटो व्यतिरीक्त इतर कोणतीही वस्तू/साहित्य सोबत घेवून येवू नये, अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

३) लेखी परीक्षा ९० मिनीटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.

४) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान २ तास अगोदर न चुकता हजर रहावे.

५) परीक्षा केंद्रावर उमेदवारास बॉल पॉईंट पेन व लेखनासाठी पॅड पुरविण्यात येतील.

६) उमेदवारांनी परीक्षा केंद्रात भ्रमणध्वनी/डिजीटल डायरी/मायक्रोफोन/मायक्रो कॅमेरा/मायक्रो कॅमेरा डिव्हाईस/कॅल्क्यूलेटर/ डिजीटल नोट पॅड/नोट्स पुस्तके/ईअरफोन/हिअरिंग डिव्हाईस/स्मार्ट वॉचेस/स्मार्ट आय ग्लासेस तसेच इलेक्ट्रॉनिक व रेडिओ फ्रिक्वेन्सी किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यास व आणण्यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारचे साहीत्य उमेदवाराने बाळगल्यास तसेच परीक्षा केंद्रात कॉपी करताना आढळून आल्यास उमेदवारास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतून बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करुन त्याचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) लेखी परीक्षेस उपस्थित राहीलेला उमेदवार डमी आढळल्यास/सूचना देवूनही मोबाईल अथवा ब्लू टूथ किंवा कॉपी करण्यासारखे इतर डिव्हाईस वापरतांना आढळल्यास त्याचेवर त्वरीत कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८) परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश दिल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

९) उत्तरपत्रिका ही कार्बनलेस(ओ.एम.आर.शीट) या प्रकारातील असून दोन प्रतीत असेल. परीक्षा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मुळ उत्तर पत्रिकेपासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये.

१०) एकापेक्षा अधिक वर्तुळे गोलांकित केल्यास अशा उत्तरास गुण दिले जाणार नाहीत.

११) अंतिम निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परीक्षेत प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका/तक्रार असल्यास त्यासंदर्भात निकालानंतर २४ तासाच्या आत उमेदवारांनी भरती अध्यक्ष नावाने रु.२००/- शुल्कासह हजर राहून लेखी निवेदन सादर करावे. २४ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

सही/-
**( डॉ. मोहन दहिकर )**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग**

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner